**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६४७४२११ विस्तारीत - ३६४२ दूरभाष : २६५८ १५१६
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## वृत्तपत्र टिप्पणी

## अनेक समस्यांमधूनही महानिर्मितीने राखले वीजनिर्मितीतील सातत्य

**(मुंबई - दि. १०/०७/२०१४) :** महानिर्मितीला गेल्या काही वर्षांपासून सातत्याने भेडसावणाऱ्या कोळसा टंचाईची समस्या, गेल्या वर्षीच्या कमी पर्जन्यमानामुळे परळी औष्णिक वीज केंद्रात उद्‌भवलेली पाणी टंचाईची समस्या तसेच यावर्षी देखील आजपर्यंत राज्यातील बहुतांशी भागात मान्सून सुरु होण्यास झालेला विलंब या अशा सर्व समस्यांमधून प्रयत्नपूर्वक मार्ग काढत महानिर्मितीने आपल्या वीजनिर्मितीत सातत्य राखले आहे.

दि. १ एप्रिल - २०१४ ते दि. ८ जुलै - २०१४ या कालावधीत महानिर्मितीने आपल्या सर्व औष्णिक विद्युत केंद्रांमधून एकूण ११८८० दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती साध्य केली आहे. गतवर्षी संबंधित कालावधीमध्ये महानिर्मितीने ९७७१ दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती साध्य केली होती. यावर्षी महानिर्मितीच्या परळी, खापरखेडा व भुसावळ या विद्युत केंद्रांना विशेष करुन जास्त प्रमाणात तीव्र कोळसा टंचाईला सामोरे जावे लागले असतानाही महानिर्मितीने राज्याची विजेची मागणी ओळखून गतवर्षीच्या तुलनेत २१०९ दशलक्ष युनिटस् इतकी वाढीव वीजनिर्मिती साध्य केली आहे. त्यामुळे पाणी टंचाईची नैसर्गिक आपत्ती तसेच कोळसा टंचाईवर मात करुन महानिर्मितीने राज्यातील वीजग्राहकांना दिलासा दिलेला आहे.

यावर्षीच्या पहिल्या तिमाहीत महानिर्मितीने साध्य केलेली ११००२ दशलक्ष युनिटस् इतकी औष्णिक वीजनिर्मितीची कामगिरी ही देशातील सर्व राज्य शासनकृत वीजकंपन्यांपेक्षा सर्वात जास्त आहे. देशातील इतर राज्य शासनकृत वीजकंपन्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या आंध्र प्रदेश जेनको कंपनी (APGENCO) च्या तुलनेने ती सुमारे १८६६ दशलक्ष युनिटस्‌ने अधिक आहे.

---

दिनांक : १०/०७/२०१४

प्रति,

**मा. संपादक,**
**दैनिक __________ / वृत्तवाहिनी**

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**